जा.क्र.पोउआ वि.शा./राजकीय /९०२३/२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- ०९/१०/२०१७

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.-** जे ज्या प्रभागाचे मतदार नाहीत त्यांनी त्या प्रभागात न थांबणेबाबत आदेश.

**आदेश :-**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग,पत्र.क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दिनांक ०६/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये पुणे महानगरपालीकामध्ये रिक्त पदासाठी पोट निवडणुक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याची आदर्श आचार संहिता दिनांक ०६/०९/२०१७ रोजी पासून लागू करण्यात आली असुन ती निवडणुकीचा निकाल जाहिर होईपर्यंत अस्तित्वात राहणार आहे. मतदान दिनांक ११/१०/२०१७ रोजी असून, दिनांक १२/१०/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

त्यानुसार पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोरेगांव पार्क, मुंढवा,हडपसर व बंडगार्डन या पोलीस स्टेशनच्या हदीत पुणे महानगरपालीका प्रभाग क्र.२१-अ, कोरेगांव पार्क-घोरपडी या प्रभागाची रिक्त पदासाठी पोटनिवडणुकीचे एकुण २० मतदान केंद्र (इमारती) व ६५ बुथवर मतदान होणार आहे.

निवडणुक आयोग भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी/२००७/पीएलएन-१/दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासुन मतदान प्रक्रीया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तींवर जर ते त्या वार्डातील मतदार नसतील तर त्या वार्डात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनीक शांततेला व मालमत्तेला धोका पोहोचु नये, सार्वजनीक शांतता बिघडु नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या वार्डाचे मतदार नाहीत त्या वार्डात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करणे जरुरीचे आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर. मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर व बंडगार्डन या पोलीस स्टेशनच्या हदीतील पुणे महानगरपालीका प्रभाग क्र.२१-अ, कोरेगांव पार्क-घोरपडी या प्रभागाच्या रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीसाठी दिनांक ०९/१०/२०१७ रोजीचे १८.०० वा. पासुन ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत एकुण २० मतदान केंद्र (इमारती) व ६५ बुथवर मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालील आदेश देत आहे.

**१.** सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षाशी संबंधित असलेली कोणतीही व्यक्ती ते ज्या वार्डाचे मतदार नाहीत त्यांनी त्या वार्डात थांबणेस/वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी ०९/१०/२०१७ रोजी दिला आहे.

जा.क्र.पोउआ/वि.शा./राजकीय /९०२४/२०१७
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा
पुणे शहर यांचे कार्यालय.
दिनांक :- ०९/१०/२०१७

**विषय** :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे** मतदान केंद्राचे १०० मिटरचे परीक्षेत्रातील व्यावसायिक दुकाने व आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश.

**आदेश,**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग,पत्र.क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दिनांक ०६/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये पुणे महानगरपालीकामध्ये रिक्त पदासाठी पोट निवडणुक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याची आदर्श आचार संहिता दिनांक ०६/०९/२०१७ रोजी पासून लागू करण्यात आली असुन ती निवडणुकीचा निकाल जाहिर होईपर्यंत अस्तित्वात राहणार आहे. मतदान दिनांक ११/१०/२०१७ रोजी असून, दिनांक १२/१०/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर व बंडगार्डन या पोलीस स्टेशनच्या हदीत पुणे महानगरपालीका प्रभाग क्र.२१-अ, कोरेगांव पार्क-घोरपडी या प्रभागाची रिक्त पदासाठी पोटनिवडणुकीचे एकुण २० मतदान केंद्र (इमारती) व ६५ बुथवर सकाळी ०७.३० ते १७.३० वा. चे दरम्यान मतदान होणार आहे. ते मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी दिनांक ११/१०/२०१७ रोजी मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये सार्वजनिक सुरक्षिततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये, यासाठी तसेच सदर परिसराचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे.अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर. या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील प्राप्त अधिकारान्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर व बंडगार्डन या पोलीस स्टेशनच्या हदीत कोरेगांव पार्क-घोरपडी या प्रभागाची रिक्त पदासाठी पोटनिवडणुकीचे एकुण २० मतदान केंद्रे (इमारती) व ६५ बुथवर १०० मीटर सभोवतालच्या परिसरामधील दिनांक ११/१०/२०१७ रोजी ००:०१ वा.पासुन ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१. २० मतदान केंद्राच्या (इमारतीच्या) परिघापासून १०० मिटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यवसाय, व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरंट, टप-या, व वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळुन) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवण्याचे आदेश देत आहे.

सदरचा आदेश दिनांक ११/१०/२०१७ रोजीचे ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.सं.कलम १८८ मधील तरतुदीनूसार कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/१०/२०१७ रोजी देणेत आला आहे.

जा.क्र.पोउआ/विशा/राजकीय/९०२५ /२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- ०९/१०/२०१७

**<u>विषय</u> :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**<u>आदेश,</u>**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग,पत्र.क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.४२/का.५ दिनांक ०६/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये पुणे महानगरपालीकामध्ये रिक्त पदासाठी पोट निवडणुक कार्यक्रम जाहीर केला आहे. पुणे महानगरपालीका प्रभाग क्र.२१-अ, कोरेगांव पार्क-घोरपडी या प्रभागाची रिक्त पदासाठी पोटनिवडणुक २०१७ साठी मतदान दिनांक ११/१०/२०१७ रोजी असून, दिनांक १२/१०/२०१७ रोजी क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे, ई-लर्निंग स्कुल, गुंजन सिनेमागृहाजवळ, येरवडा, पुणे. याठिकाणी मतमोजणी कार्यक्रम होणार आहे.

सदर मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखणेकामी, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी “क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे, ई-लर्निंग स्कुल, गुंजन सिनेमागृहाजवळ, येरवडा, पुणे.” येथील २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे, ई-लर्निंग स्कुल, गुंजन सिनेमागृहाजवळ, येरवडा, पुणे. येथील २०० मीटर परिसरात दिनांक १२/१०/२०१७ चे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.

   सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकिय कर्मचा-यांना (पोलीस दल, सरंक्षण दल, तुरूंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही. तसेच ज्या परवाना धारकास रूढीप्रमाणे बंदूक प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)

३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकूर लिहण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणीच्या परिसरात अधिकृत पासाशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दिनांक १२/१०/२०१७ रोजी विजयी मिरवणुका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दिला आहे.